# प्रकरण तिसरे

## "माधवनगर कॉटन मिल्स - अभ्यासनमुन्यातील कामगारांचा कौटुंबिक परिचय"

# प्रकरण तिसरे

## "माधवनगर कॉटन मिल्स् - अभ्यासनमुन्यातील कामगारांचा कौटुंबिक परिचय"

### कौटुंबिक पार्श्वभूमी :

कामगाराचा सामाजिक - आर्थिक अभ्यास करण्यासाठी कामगाराची कौटुंबिक माहिती मिळविणे गरजेचे ठरते. कामगार ज्या कुटुंबात जन्मतो, वाढतो त्या कुटुंबाच्या पार्श्वभूमीचा प्रभाव कामगाराच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर पडतो. कामगाराच्या कुटुंबाचा प्रकार, कुटुंबातील सदस्यांची संख्या, वडीलोपार्जित व्यवसाय, राहत्या गांवची मालमत्ता, कुटुंबातील मिळवत्या सदस्यांची संख्या, कामगाराच्या मुलांची संख्या, कौटुंबिक शस्त्रक्रिया या संबधित माहिती मिळविल्यास कामगाराच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकणे सहज शक्य होते. कामगाराच्या कुटुंबाची आर्थिक बाजू, कामगार कुटुंबाचा आकार, कामगाराच्या कुटुंबाची कुटुंब नियोजनाबाबतची विचारसरणी समजणे शक्य होते.

### १.१ कामगारांच्या कुटुंबाचा प्रकार :

तक्ता क्र.३.१

| कुटुंबाचा प्रकार | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| एकत्र कुटुंब | ४ | १२.१ |
| विभक्त कुटुंब | २९ | ८७.९ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

एकत्र कुटुंब पध्दती ही अजूनही भारतात काही अंशी संस्कृती मानली जाते. त्यामुळे ब-याच कुटुंबात एकत्र कुटुंब पध्दती आढळते. भारतातील प्रमुख व्यवसाय शेती. शेती ही पावसावर आधारित असल्याने पावसाच्या लहरीपणामुळे शेती उत्पन्नात अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे उदरनिर्वाहाच्या हेतूने लोक शहराकडे धाव घेत आहेत. नोकरी निमित्ताने गावापासून दूर राहणे, कुटुंबातील संख्या वाढल्याने वाढत्या खर्चाचे प्रमाण, स्वातंत्र्यप्रियता या सर्वांचा परिणाम म्हणून विभक्त कुटुंब पध्दतीचे प्रमाण वाढत आहे. माधवनगर कॉटन मिलमध्ये काम करणारे कामगार दुधोंडी, कवठेमहांकाळ, करगणी, कोरेगांव, नागज, अथनी अशा लांबच्या ठिकाणाहून आलेले आहेत. दीर्घकाळ नोकरी निमित्ताने कुटुंबासह दूर राहिल्याने साहजिकच विभक्त कुटुंबाचे प्रमाण वाढत आहे. सदर अभ्यासात मुलाखत घेतलेल्या ३३ कामगारांच्यापैकी २९ कामगारांच्यात विभक्त कुटुंब पध्दती आढळते. तर फक्त ४ कामगारांच्यात एकत्र कुटुंब पध्दती आढळते. या ४ पैकी एका कामगाराचे आई-वडिल, भाऊ दुस-या गावी राहतात, मात्र त्याच्या घरचे सर्व व्यवहार एकत्र कुटुंब पध्दतीनुसार चालतात. गिरणीतील ३३ पैकी २९ कामगारांच्यात विभक्त कुटुंब पध्दती आढळते हे प्रमाण शेकडा ८७.९ इतके आहे. तर शेकडा १२.१ कामगारांच्यात एकत्र कुटुंब पध्दती आढळते.

१.२ कुटुंबातील सदस्य संख्या :

तक्ता क्र.३.२

| कुटुंबातील सदस्य संख्या | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ ते ४ सदस्य | ६ | १८.२ |
| ५ ते ८ सदस्य | २३ | ६९.७ |
| ९ ते १२ सदस्य | २ | ६.१ |
| १३ ते १६ सदस्य | १ | ३.० |
| १७ ते २१ सदस्य | - | - |
| २२ ते २५ सदस्य | १ | ३.० |
| एकूण .. | ३३ | १००.० |

कामगारांच्या आर्थिक - सामाजिक स्थितीवर प्रकाश टाकण्यास त्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या हा घटक महत्त्वाचा ठरतो. सदर गिरणीतील शेकडा ८८ कामगारांच्यात विभक्त कुटुंब पध्दती आहे. त्यामुळे कुटुंबातील सदस्य संख्या किती आहे याला महत्त्व प्राप्त होते. सदर गिरणीतील ३३ निवड कामगारांपैकी ६ कामगारांच्या कुटुंबात १ ते ४ सदस्य संख्या आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. २३ कामगारांच्या कुटुंबात ५ ते ८ सदस्य आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६९.७ आहे. २ कामगारांच्या कुटुंबात ९ ते १२ सदस्य आहेत. अशा कामगारांचे शेकडा प्रमाण ६.१ आहे. एका कामगारांच्या कुटुंबात १३ ते १६ सदस्य आहेत. म्हणजे गिरणीतील शेकडा ३.०कामगारांच्यात ही सदस्य

संख्या आहे. तर एका कामगाराच्या कुटुंबात २२ ते २५ सदस्य संख्या आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे.

सदर पाहणीत कामगार कुटुंबात ८ पर्यंत सदस्य संख्या असणारे २९ निवड कामगार आहेत. मागे अभ्यासल्याप्रमाणे २९ निवड कामगारांच्यात विभक्त कुटुंब पध्दती आहे. म्हणजेच गिरणीतील शेकडा ८७.९ कामगारांच्या कुटुंबात ८ पर्यंत सदस्य संख्या आहे. तर एकत्र कुटुंब पध्दती अस्तित्वात असलेल्या ४ कामगारांच्या कुटुंबात २५ पर्यंत सदस्य संख्या असून अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १२.१ आहे.

१.३ कामगारांच्या कुटुंबात मिळवत्या सदस्यांची संख्या :

तक्ता क्र. ३.३

| मिळवत्या सदस्यांची संख्या | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | २१ | ६३.६ |
| २ | ८ | २४.३ |
| ३ | ३ | ९.१ |
| ४ | १ | ३.० |
| एकूण .. | ३३ | १००.० |

कुटुंबात मिळवत्या व्यक्ती किती आहेत यावरून त्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीची सहज कल्पना येते. एकच व्यक्ती मिळवती असेल आणि इतरजण

खाणारे असतील तर येणारा सर्व पगार उपभोगावर खर्च होतो. किंबहुना उपभोग खर्च भागविणे मुष्किल होते. त्यामुळे इतर कोणत्याही प्रकारची प्रगती करणे कठीण होते. उलट मिळवत्या सदस्यांची संख्या जास्त असेल तर आर्थिक भार उचलण्यास मदत होते. त्यामुळे कुटुंबाच्या गरजा भागविणे सहज शक्य होते. राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होते. सदर गिरणीतील निवड कामगारांपैकी २१ कामगारांच्या कुटुंबात कामगार एकटाच मिळवता सदस्य असल्याचे दिसते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६३.६ आहे. ८ कामगारांच्या कुटुंबात २ मिळवते सदस्य आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.३ आहे. ३ कामगारांच्या कुटुंबात ३ मिळवते सदस्य आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ९.१ आहे. तर एका कामगाराच्या कुटुंबात मिळवत्या सदस्यांची संख्या ४ आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. सदर अभ्यासात वरती अभ्यासल्याप्रमाणे २९ कामगारांच्यात विभक्त कुटुंब पध्दती आहे. त्यांच्यापैकी २१ कामगारांच्यात तो एकटा मिळवितो तर ८ कामगारांच्या कुटुंबात दोन मिळवते सदस्य आहेत. मात्र एकत्र कुटुंब पध्दती असलेल्या ४ कामगारांच्यातील ३ कामगारांच्या कुटुंबात ३ सदस्य मिळवतात तर एका कामगाराच्या कुटुंबात ४ सदस्य मिळवतात.

## १.४ कामगारांच्या मुलांचे प्रमाण :

तक्ता क्र. ३.४

| मुलांची संख्या | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ० | १ | ३.० |
| १ | ५ | १५.१ |
| २ | १० | ३०.३ |
| ३ | ९ | २७.३ |
| ४ | ६ | १८.२ |
| ५ | २ | ६.१ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

कामगारांच्या सामाजिक - आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना कामगाराचे कुटुंब आणि कुटुंबातील कामगाराची स्वत:ची मुले याला अधिक महत्व प्राप्त होते. कुटुंबातील मुलांची संख्या जितकी जास्त असेल तितका कुटुंबाचा खर्च वाढतो, मुलांना सकस आहार देणे अशक्य होते, त्यांच्या शारीरिक व मानसिक वाढीकडे योग्य लक्ष देता येत नाही. याहीपेक्षा मुलांना योग्य शिक्षण देता येत नाही. या गोष्टींची जाणीव लोकांना करुन देण्याच्या हेतूने भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर कालानंतर लोकसंख्या नियंत्रणाच्या उपायांवर अधिक भर दिला आहे. कुटुंबनियोजन, कुटुंब कल्याण या मार्गांनी वाढत्या लोकसंख्येला पायबंद घालण्याचे प्रयत्न सुरु आहेत. सरकारच्या प्रयत्नांना बहुतांश यश येत असल्याचे सदर अभ्यासावरुन दिसून येते. कुटुंबातील मुलांची संख्या जितकी अधिक तितके मिळवते हात अधिक,

मुले ही देवाघरची फुले यासारखे विचार चूक आहेत असे कामगारांचे विचार मुलाखतीच्या वेळी लक्षात आले. दोन किंवा तीन मुले पुरे हा विचार बहुतांश लोकांनी अंगिकारलेला दिसून आला.

सदर पाहणीत ३३ निवड कामगारांपैकी एका कामगाराला मुले नाहीत. अर्थात या कामगाराने मुले होण्याची वयोमर्यादा ओलांडलेली आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. ५ कामगारांना प्रत्येकी एक मूल आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १५.१ आहे. १० कामगारांना दोन-दोन मुले आहेत. गिरणीत अशा कामगारांचे शेकडा प्रमाण ३०.३ आहे. ९ कामगारांना ३-३ मुले आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २७.३ आहे. ६ कामगारांना ४-४ मुले आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. तर २ कामगारांना ५-५ मुले आहेत. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे.

१.५.१ <u>कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया</u> :

<u>तक्ता क्र.३.५</u>

| कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणारे | २५ | ७५.८ |
| कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया न करणारे | ८ | २४.२ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

देशाची वाढती लोकसंख्या ही देशाच्या सर्वांगीण विकासातील खीळ ठरू शकते. हे भारताच्या लोकसंख्या वाढीच्या समस्येवरून लक्षात येते. तद्वतच

कुटुंबातील वाढती मुलांची संख्या सुध्दा कुटुंबाच्या विकासातील अडथळा ठरते. हे अलिकडे लोकांना ज्ञात झाले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात लोकसंख्या नियंत्रणाच्या दृष्टीने कुटुंब नियोजन, कुटुंब कल्याणाचा प्रसार वेगाने झाला आहे. कुटुंब नियोजन सक्तीचे करुन लोकसंख्या नियंत्रणाचा प्रयत्न करण्यात आला. अलिकडे लोकांना कुटुंब नियोजनाचे महत्व पटले असल्याने कुटुंब नियोजन शास्त्रक्रियेचा मार्ग लोक स्वेच्छेने स्वीकारीत आहेत. माधवनगर कॉटन मिलमधील कामगारांच्या मुलाखतीद्वारे याही बाबीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. मुलाखत घेतलेल्या ३३ कामगारांपैकी कुटुंब नियोजन शास्त्रक्रिया केली आहे असे होकारार्थी उत्तर देणारे २५ आहेत. तर कुटुंब नियोजन शास्त्रक्रिया केली नाही असे उत्तर देणारे ८ कामगार आहेत. या ८ कामगारांपैकी काही कामगारांना आता १ अगर २ मुले तीही खूप लहान असल्याचे त्यांच्या माहितीवरुन समजले. म्हणजेच बहुतांश कामगारांना कुटुंब नियोजनाचे महत्व पटलेले आहे. ३३ पैकी २५ कामगारांचे उत्तर होकारार्थी आहे. म्हणजेच गिरणीतील शेकडा ७५.८ कामगारांनी शास्त्रक्रियेचा मार्ग अवलंबलेला आहे. शेकडा २४.२ कामगारांनी अद्याप तो मार्ग अवलंबलेला नाही असे दिसून येते. अधिक मुले असतील तर मुलांसाठी योग्य लक्ष देता येत नाही, त्यांच्या शिक्षणांवर व्यवस्थित खर्च करता येत नाही असे विचार ब-याच कामगारांनी बोलून दाखविले.

१.५.२ <u>कुटुंब नियोजन शास्त्रक्रिया करुन घेणारे :</u>

तक्ता क्र.३.६

| शास्त्रक्रिया करुन घेणारे | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| पुरुष | १ | ४ |
| स्त्रिया | २४ | ९६ |
| एकूण .. | २५ | १०० |

कुटुंब नियोजन शास्त्रक्रिया कोणी केली ( स्त्री अगर पुरुष ) या प्रश्नाला मिळालेले उत्तर विचार करायला लावणारे आहे. सदर गिरणीत कुटुंबनियोजन शास्त्रक्रिया केली असे होकारार्थी उत्तर देणारे ३३ पैकी २५ कामगार आहेत. म्हणजेच गिरणीतील शेकडा ७६ कामगारांनी कुटुंबनियोजन शास्त्रक्रियेला होकार दिला. मात्र शास्त्रक्रिया कोणी केली ( पुरुष अगर स्त्री ) यात शास्त्रक्रिया करणाऱ्या २५ जणांपैकी २४ स्त्रिया आणि फक्त १ पुरुष असे प्रमाण दिसून आले. म्हणजे शेकडा ९६ स्त्रियांची शास्त्रक्रिया केली जाते तर शेकडा फक्त ४ पुरुष शास्त्रक्रिया करतात. म्हणजे अद्यापही शास्त्रक्रियेबाबतची भिती लोकांच्या मनातून गेलेली नाही. पुरुष शास्त्रक्रिया कमी त्रासाची असूनही स्त्रियांच्या शास्त्रक्रियेचे प्रमाण अधिक आहे.

## १.६ वडीलोपार्जित व्यवसाय :

कामगारांच्या सामाजिक - आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना कामगाराच्या कुटुंबाचा आकार, कुटुंबातील मुलांची संख्या, कुटुंबातील सदस्य संख्या, मिळवत्या सदस्यांची संख्या या बाबींबरोबरच कामगाराच्या वडिलांचा व्यवसाय कोणता होता हे अभ्यासणेही महत्त्वाचे ठरते.

तक्ता क्र. ३.७

| वडिलांचा व्यवसाय | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| शेतकरी | १६ | ४८.५ |
| शेतमजुरी | ६ | १८.२ |
| नोकरी | ८ | २४.२ |
| धंदा | १ | ३.० |
| इतर | २ | ६.१ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

सदर गिरणीतील ३३ निवड कामगारांपैकी १६ कामगारांचे वडील शेती करीत होते. गिरणीतील कामगारांमध्ये हे प्रमाण शेकडा ४८.५ आहे. ६ कामगारांचे वडील शेतमजुरी करीत होते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १८.२ आहे. ८ कामगारांचे वडील नोकरी करीत होते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.२ आहे. एका कामगाराचे वडील भाजीपाला विक्रीचा धंदा करीत होते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. तर २ कामगारांचे वडील इतर व्यवसाय करीत. म्हणजेच एकाचे स्वातंत्र्यसैनिक होते तर दुसऱ्याचे घोडेस्वार होते. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे.

## १.७ कामगारांच्या राहत्या गांवावरून वर्गीकरण :

तक्ता क्र.३.८

| राहते गांव | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| माधवनगर | ४ | १२.१ |
| माधवनगर जवळपास | १४ | ४२.४ |
| माधवनगर पासून लांबच्या गांवचे | १५ | ४५.५ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

माधवनगर कॉटन मिलमध्ये काम करणारे सर्वच कामगार माधवनगरचे नाहीत. कामगारांचे राहते गांव कोणते यावरून वर्गीकरण केल्यास सदर अभ्यासासाठी निवडलेल्या ३३ कामगारांपैकी फक्त ४ कामगार मूळ माधवनगरचे राहणारे आहेत. माधवनगर जवळपास बुधगांव, कुपवाड, कौलापूर, कुमठे,

बिसूर, मिरज, तासगांव, मौजे डिग्रज अशा ठिकाणाचे म्हणजे रोज आपल्या गांवाहून गिरणीत कामाला येऊ शकणारे माधवनगर जवळ पासचे ३३ पैकी १४ कामगार आहेत. तर कोरेगाव, नागज, बुर्ली, आथनी, करगणी अशा लांबच्या ठिकाणचे नोकरीसाठी माधवनगर अगर जवळपास राहावे लागणारे कामगार ३३ पैकी १५ आहेत. म्हणजेच गिरणीत शेकडा १२.१ कामगार माधवनगरचे, शेकडा ४२.४ कामगार माधवनगर जवळपासचे तर शेकडा ४५.५ कामगार माधवनगर पासून लांबच्या अंतरावरून आलेले आहेत.

१.८ राहत्या गांवची मालमत्ता :

वाढती लोकसंख्या, अपुरा पाऊस, शेती उत्पन्नात दिवसेंदिवस होत असलेली घट, शेतीचे तुकडीकरण, वाढती महागाई, रोजगाराचा अभाव, यामुळे गांवात राहून सर्वांचा उदरनिर्वाह भागविणे अशक्य होत आहे. त्याचा परिणाम म्हणून लोक गांवातून शहराकडे नोकरीसाठी धाव घेत आहेत. नोकरी निमित्ताने बाहेर येणा-यांना वारंवार गांवी जाणे शक्य नसल्याने ते आपले कुटुंबच नोकरीच्या गांवी करतात. अशा कामगारांचे घर, शेत अशी मालमत्ता गांवी असते. माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांचा सामाजिक - आर्थिक अभ्यास करताना त्यांच्या राहत्या गांवची मालमत्ता विचारात घेणे गरजेचे ठरते. माधवनगर कॉटन मिलमधील मुलाखत घेतलेल्या ३३ कामगारांपैकी -

तक्ता क्र. ३.९

| कामगारांची मालमत्ता | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| घर व शेत | १८ | ५४.६ |
| घर, शेत व पडीक जमीन | २ | ६.१ |
| घर व पडीक जमीन | १ | ३.० |
| घर, शेत व इतर मालमत्ता | १ | ३.० |
| घर | ८ | २४.२ |
| कोणत्याही प्रकारची मालमत्ता नाही. | ३ | ९.१ |
| एकूण .. | ३३ | १००.० |

सदर गिरणीतील ३३ निवड कामगारांपैकी १८ कामगारांना त्यांच्या गांवी घर व शेत ही मालमत्ता आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ५४.६ आहे. २ कामगारांना घर, शेत व पडीक जमीन या स्वरूपाची मालमत्ता आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.१ आहे. एका कामगाराची घर व पडीक जमीन आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. एका कामगाराची घर, शेत व इतर मालमत्ता आहे अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३ आहे. ८ कामगारांना फक्त घर आहे. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण २४.२ आहे. तर कोणत्याही प्रकारची मालमत्ता नसणारे ३ कामगार असून गिरणीतील त्यांचे शेकडा प्रमाण ९.१ आहे. म्हणजेच गिरणीतील कामगारांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची मालमत्ता असणारे कामगार शेकडा ९१ इतके आहेत तर कोणत्याही प्रकारची मालमत्ता नसलेले कामगार

शेकडा ९ आहेत. ब-याचदा शेतीच्या हंगामाच्या काळात पेरणी, खुरपणी, काढणी या कामानिमित्त मालमत्ता धारक कामगार कामावर गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता अधिक असते.

१.९ राहत्या गांवी कामगार भेट -

माधवनगर कॉटन मिलमध्ये काम करणारे कामगार माधवनगर, माधवनगरच्या जवळपास आणि माधवनगर पासून लांबच्या अंतरावरील आहेत. माधवनगर जवळील कामगार त्यांच्या गांवावरूनच रोज कामावर येतात. परंतु माधवनगर पासून लांबच्या अंतरावरून येणारे कामगार माधवनगर अगर त्याच्या जवळपास घर करून राहात असल्याचे अभ्यासावरून आढळते. सदर अभ्यासात मुलाखत घेतलेले ३३ पैकी ४ कामगार माधवनगरचे आहेत. १४ कामगार माधवनगर जवळपासचे तर १५ कामगार माधवनगरपासून लांबच्या गांवचे आहेत. म्हणजेच शेकडा ४६ कामगार लांबचे आहेत. लांबून येणा-या ३३ पैकी १५ कामगारांची त्यांच्या राहत्या गांवी घर, जमीन, पडीक जमीन अशा स्वरूपाची काही ना काही मालमत्ता असल्याचे अभ्यासावरून आढळले. लांबच्या अंतरावरील असलेल्या १५ कामगारांना राहत्या गांवी भेट देता का ? या विचारलेल्या प्रश्नाला सर्वच्या सर्व म्हणजे १५ कामगारांनी होकारार्थी उत्तर दिले. म्हणजेच बाहेरून येणारे १०० टक्के कामगार काही ना काही कारणाने त्यांच्या राहत्या गांवी भेट देतात.

१.१० <u>राहत्या गांवी भेट देण्याच्या कारणावरुन वर्गीकरण :</u>

<u>तक्ता क्र. ३.१०</u>

| राहत्या गांवी भेट देण्याचे कारण | कामगार संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| आई-वडिलांची भेट घेण्यास | ५ | ३३.४ |
| नातलगांना भेट देण्यास | ६ } ७ | ४०.० } ६.७ |
| मित्रांना भेटण्यास | - | |
| गांवच्या यात्रेसाठी | १ | ६.१ |
| सण व इतर कार्यक्रमासाठी | २ | १३.३ |
| एकूण .. | १५ | १००.० |

वीज, पाणी, कच्चा माल, वाहतूक सुविधा जिथे उपलब्ध असतात अशा सोयीच्या ठिकाणीच औद्योगिक विकास होतो. कारखाने उभारले जातात. खेडयात औद्योगिक विकासाचा अभाव असल्याने, शेतीचा मागासलेपणा, यामुळे नोकरी मिळविण्याच्या हेतूने खेडयातील कामगार शहराकडे आकृष्ट होतात. त्यामुळे गांवची मालमत्ता, आई-वडिल, नातलग यांच्यापासून हे कामगार दूर फेकले जातात. एकाकी बनतात. हे कामगार वारंवार काही ना काही निमित्ताने आपल्या राहत्या गांवी भेट देण्यास जातात. माधवनगर कॉटन मिल मधील कामगारांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना मुलाखत घेतलेल्या ३३ पैकी १५ कामगारांचे राहते गांव माधवनगर पासून लांबचे असल्याचे दिसून आले. या कामगारांची राहत्या गावी शेती, घर, पडीक जमीन अशी काही ना काही स्वरुपाची मालमत्ता

आहे. त्यामुळे हे सर्वच्या सर्व कामगार त्यांच्या राहत्या गांवी काही ना काही कारणानी भेट देतातच. सदर गिरणीतील १५ पैकी ५ कामगार आपल्या आई-वडिलांना भेटण्यास राहत्या गांवी भेट देतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ३३.४ आहे. ६ कामगार नातलगांना भेटण्यास गांवी भेट देतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ४० आहे. एक कामगार गांवच्या यात्रेसाठी गांवी भेट देतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.७ आहे. २ कामगार सण व इतर कार्यक्रमासाठी गांवी भेट देतात. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण १३.३ आहे. तर एक कामगार गांवच्या यात्रेसाठी व नातलगांना भेटण्यास अशा दोन्ही कारणांसाठी राहत्या गांवी भेट देतो. अशा कामगारांचे गिरणीतील शेकडा प्रमाण ६.७ आहे. राहत्या गांवी वारंवार भेट दिल्याने कामगाराच्या गैरहजेरीचे प्रमाण अधिक वाढते. त्यामुळे त्यांच्या मासिक उत्पन्नावर त्याचा दुष्परिणाम होतो.

## १.११ कामगाराच्या कुटुंबाचे मुख्य प्रश्न :

सदर अभ्यासाचा हेतू कामगारांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे हा असल्याने कामगारांची कौटुंबिक माहिती मिळविताना कामगाराच्या कुटुंबाला भेडसावणाऱ्या मुख्य प्रश्नांची माहिती करुन घेणे आवश्यक ठरते. सदर अभ्यासाच्या दृष्टीने कामगारांची मुलाखत घेताना कामगारांकडून त्यांच्या कुटुंबात भेडसावणाऱ्या समस्यांची कल्पना आली. गिरणीत काम करणारे बहुतांश कामगार आर्थिक स्थिती बेताची असलेल्या कुटुंबातील आहेत. मुलाखत घेतलेल्या ३३ कामगारांपैकी १६ कामगारांच्या वडीलांचा व्यवसाय शेती, ६ कामगारांचे वडील शेतमजूरी करणारे, ८ कामगारांचे वडील नोकरी करणारे एका कामगाराचे वडील धंदा करणारे तर २ कामगारांचे वडील इतर सदरात मोडतात. म्हणजेच कामगारांची आर्थिक स्थिती नाजूक

असल्याचे दिसते. त्यामुळे कामगाराच्या कुटुंबात आर्थिक स्वरूपाचेच प्रश्न अधिक असल्याचे दिसते. मुलाखत घेतलेल्या ३३ कामगारांपैकी ३० कामगारांना २०००/- रु. पेक्षा कमी पगार मिळतो. कामगारांना मिळणाऱ्या अपुऱ्या पगारामुळे, वाढत्या महागाईमुळे कौटुंबिक खर्च भागविणे अडचणीचे होते, येणारा पगार घरगुती खर्चास अपुरा पडतो. त्यामुळे मुलांना शिक्षण देणे अडचणीचे ठरते. बऱ्याचदा दैनिक खर्चासाठी, मुलींच्या लग्नासाठी, आजारपणाच्या खर्चासाठी, घर बांधण्यासाठी कर्ज काढावे लागते. त्यामुळे हातात अल्प पगार येतो. त्यात घरखर्च भागविणे अशक्य होते. त्यामुळे पुन्हा कर्जाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याने कामगार कर्जाच्या सापळ्यातच अडकतो. बऱ्याच कामगारांना स्वत:चे घर नाही. त्यामुळे भाड्याच्या घरात राहताना भरभराट भाडे द्यावे लागते. बऱ्याच कामगारांच्या घरात लाईट, पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. काही कामगारांच्या विवाहित मुली, सासरी न राहता माहेरी राहात असल्याने कामगार अस्थिर आहेत, काही कामगारांची मुले मोठी आहेत पण त्यांना नोकरी मिळणे कठीण आहे, अपुऱ्या पगारामुळे गांवी काही प्रगती करणे अशक्य आहे. यासारख्या अनेक विध अडचणी कामगारांना भेडसावत असल्याने कामगार विवंचनेत असल्याचे दिसून आले.

......